# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.01.2026** **वारःमंगळवार**

---

1. केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज दिल्लीत पोषण सुरक्षा विषयावरील सीएसआर परिषदेचं उद्घाटन.
2. ईपीएफओच्या वेतन मर्यादेत सुधारणा करण्याबाबत येत्या चार महिन्यांत निर्णय घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश
3. व्हेनेझुएलाचे हंगामी राष्ट्राध्यक्ष म्हणून डेल्सी रॉड्रिग्ज यांचा शपथविधी
4. जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मेर्झ येत्या 12 आणि 13 जानेवारीला भारताच्या दौऱ्यावर आणि
5. माजी केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ कॉंग्रेस नेते सुरेश कलमाडी यांचं पुण्यात निधन

**सीएसआर**

नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात सीएसआर परिषदेचं उद्घाटन आज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. 'पोषण सुरक्षा आणि कुपोषण निवारणामध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधीची भूमिका' या विषयावरील ही परिषद असून यामध्ये मुलांमधील कुपोषणाचा सामना करण्यासाठी सहयोगी, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत धोरणांवर विचारमंथन करणे हा या परिषदेचा उद्देश आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळानं या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेदरम्यान अमित शाह यांच्या हस्ते शिशु संजीवनी उपक्रमाचं उद्घाटन करण्यात येणार असून त्याद्वारे महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये शिकणाऱ्या सुमारे तीन हजार मुलांना पौष्टिक आहार प्रदान करण्यात येणार आहे.

**सोमनाथ-पंतप्रधान**

अनादि काळापासून झालेले हल्ले आणि प्रतिकूल परिस्थितीत आज डौलाने उभे राहिलेले सौराष्ट्रातील सोमनाथ मंदिर हे देशाच्या अढळ सांस्कृतिक भावनेचे प्रतीक असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. 1026 मध्ये सोमनाथ मंदिरावर झालेल्या पहिल्या हल्ल्याला यंदाच्या वर्षी हजार वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने पंतप्रधानांनी लिहिलेल्या लेखामध्ये सोमनाथ मंदिर देशावासियांच्या मनात अभिमानाची भावना जागृत करते, ते देशाचा आत्मा आहे. सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारालाही यंदा पंच्चाहत्तर वर्ष पूर्ण होत आहेत हा देखील महत्त्वाचा टप्पा गाठल्याचे मोदी यांनी नमूद केले आहे. सोमनाथ अशा संकटांना तोंड देत उभे आहे, तेव्हा देशही त्याचे गतवैभव निश्चित मिळवू शकतो असंही त्यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी 11 जानेवारीला सोमनाथला भेट देणार असून, या मंदिराच्या पुनर्निर्माणाच्या अमृतमहोत्सवानिमित्त यंदाचं वर्ष स्वाभिमान पर्व म्हणून साजरं करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. तर गुरुवारपासून 11 तारखेपर्यंत आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे.

**भविष्य निर्वाह**

ईपीएफओच्या गेल्या 11 वर्षांपासून बदल न झालेल्या वेतन मर्यादेत सुधारणा करण्याबाबत येत्या चार महिन्यांत निर्णय घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेला दिले आहे. न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांच्या खंडपीटाने हे निर्देश दिले आहेत. संघटित क्षेत्रातील

कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचा उद्देश कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमागे आहे. मात्र वेतन मर्यादा स्थिर राहिल्याने कामगारांचा मोठा वर्ग यामधून वगळला जात असल्याबाबत एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती; त्यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश दिले.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्रा डॉ. एस. जयशंकर कालपासून फ्रान्सच्या दौऱ्यावर आहेत. चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आयोजित फ्रेंच-भारतीय युवा प्रतिभा कार्यक्रमात काल त्यांनी सहभागींशी संवाद साधला. समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात, जयशंकर यांनी जागतिक बदलांवर आणि त्या संदर्भात दोन्ही देशांमधील सहकार्याच्या महत्त्वाविषयी चर्चा केली. तसेच त्यांनी आंतरराष्ट्रीय ऊर्जा एजन्सीचे कार्यकारी संचालक फातिह बिरोल यांची युरोप दौऱ्यात भेट घेतली. या दरम्यान जागतिक ऊर्जा स्थिती आणि भारताच्या विकास प्राधान्यक्रमांवर चर्चा झाली. तसेच भागीदार देशांबरोबरच्या सांस्कृतिक संबंधांवरही प्रकाश टाकला आहे. पॅरिसमध्ये फ्रान्सच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करतील तसेच समकक्ष जीन नोएल बॅरोट यांच्याशीही चर्चा करणार आहेत. या दौऱ्यात फ्रेंच राजदूतांच्या परिषदेच्या 31व्या आवृत्तीला संबोधित करणार आहेत.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात परराष्ट्र व्यवहार मंत्री जयशंकर लक्झेंबर्गचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री झेवियर बेटेल यांच्याशी आणि वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करतील. तसेच तेथील भारतीय समुदायाशी संवाद साधतील.

**रॉड्रिग्ज**

व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्राध्यक्ष म्हणून डेल्सी रॉड्रिग्ज यांनी काल शपथ घेतली. रॉड्रिग्ज यांनी 2018 पासून मादुरो यांच्यासोबत उपराष्ट्रपती म्हणून काम केलं होतं, तसंच त्यांनी व्हेनेझुएलाच्या तेल-आधारित अर्थव्यवस्थेचा मोठा भाग आणि गुप्तचर सेवेची जबाबदारी देखील सांभाळली होती.

दरम्यान, व्हेनेझुएलाचे नेते निकोलस मादुरो यांनी न्यूयॉर्कमधल्या फेडरल न्यायालयात त्यांच्यावरील अनेक आरोपांचं खंडन केलं. तसंच मादुरो यांनी आपल्या अटकेच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. तर मादुरो यांच्या वकिलांनी या अटकेचं वर्णन लष्करी अपहरण असं केलं असून रात्री उशिरा केलेल्या या कारवाईनं आंतरराष्ट्रीय कायदा आणि योग्य प्रक्रियेच्या संरक्षणाचं उल्लंघन केल्याचं म्हटलं आहे.

**व्हेनेस्विस**

व्हेनेझुएलाचे पदच्युत अध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या संबंधित स्वित्झर्लंडमधील मालमत्ता गोठवण्याचे आदेश स्वित्झर्लंडने दिले आहेत. या मालमत्ता अवैध मार्गाने मिळवलेल्या असून या मालमत्तां स्थानिक नागरिकांच्या कल्याणासाठी वापरण्यात येतील, असं स्वित्झर्लंड सरकारने म्हटलं आहे.

**इराण समस्या**

इराणमध्ये गेल्या तीन वर्षांतील सर्वांत गंभीर अशांततेची परिस्थिती निर्माण झाली आहे. इराणमध्ये गेले दहा दिवस देशव्यापी निदर्शने सुरू आहेत. सुरक्षा दलांनी प्रमुख शहरांमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे तर दुसरीकडे निदर्शने, हिंसाचारात वाढ झाल्यास निदर्शकांच्या बाजूने उभं राहाण्याचा इशारा अमेरिका ने दिला आहे.

**जर्मन चान्सलर**

जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मेर्झ येत्या 12 आणि 13 जानेवारीला भारताच्या अधिकृत दौऱ्यावर येत आहेत. या दरम्यान ते अहमदाबाद आणि बंगळुरूला भेट देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आमंत्रणावरून हा दौरा होणार आहे. दोन्ही नेते भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीच्या विविध पैलूंचा आढावा घेतील. दोन्ही देशांच्या भागीदारीला गेल्या वर्षी

पंचवीस वर्ष पूर्ण झाली. या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, कौशल्य विकास आदी क्षेत्रांतील सहकार्य दृढ करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**प्रधान साहित्य**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते आज दिल्ली अभिजात कन्नड, तेलगु, मल्याळम् आणि ओडिया भाषांच्या उत्कृष्टता केंद्रांनी विकसित केलेल्या 41 साहित्यकृतींचे प्रकाशन होणार आहे. केंद्रीय भारतीय भाषा संस्थेअंतर्गत विकसित करण्यात आल्या आहेत. त्यासह या कार्यक्रमात 13 पुस्तके आणि 45 भागांच्या सांकेतिक भाषेतील अर्थविवरण मालिकेसह 13 पुस्तकांचे प्रकाशन केले जाणार आहे. शिक्षण मंत्रालयाने समाज माध्यमांवर दिलेल्या संदेशात अभिजात भाषांच्या अभ्यासाला बळकटी देणे तसेच देशाचा समृद्ध साहित्यिक वारसा जपण्यासाठी असलेल्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे ते प्रतिबिंब असल्याचे नमूद केले आहे.

**आयुष परिषद**

तिसरी आंतरराष्ट्रीय आयुष परिषद आणि प्रदर्शन येत्या 15 ते 17 फेब्रुवारी दरम्यान दुबईच्या वर्ल्ड ट्रेड सेंट्रलमध्ये होणार आहे. या मध्ये 35 देशांतील डॉक्टर, संशोधक, धोरणकर्ते, उद्योग प्रतिनिधी आणि पारंपरिक चिकित्सा पद्धतींचे विद्यार्थी सामील होणार आहेत. आयुष मंत्रालय आणि दुबईच्या भारतीय वाणिज्य दुतावासा अंतर्गत जागतिक आयुर्वेद फाउंडेशनच्या सहकार्याने सायन्स इंडिया फोरम याचे आयोजन करणार आहे.

**क्रिकेट**

19 वर्षांखाली क्रिकेटमध्ये काल दक्षिण अफ्रिका इथं सुरु असलेल्या तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने यजमान दक्षिण अफ्रिकेचा डकवर्थ लुईस नियमानुसार 8 गडी राखून पराभव केला. या विजयासह भारताने ही मालिका जिंकली आहे. भारताला 174 धावांचे सुधारित लक्ष्य मिळाले होते. भारताने दोन गडी गमावून ते पार केले.

**कलमाडी निधन**

माजी केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे 82व्या वर्षी पुण्यात निधन झाले. काही दिवसांपासून ते आजारी होते. भारतीय हवाई दलात सेवा बजावल्यानंतर कलमाडी नंतर राजकारणात सक्रीय झाले. ते ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्षही होते. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये त्यांनी रेल्वे राज्य मंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली होती. पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी पुण्यात अंत्यसंस्कार होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार